## नि.दि.मु. क्र. ६५/२०१० मधील आयए क्र. १/२०२२ (निशाणी १७५) वरील आदेश

दोन्ही बाजूच्या विधीज्ञांच्या युक्तिवाद ऐकला. कागदपत्रांचे अवलोकन केले.

०२. प्रतिवादीने दाव्याच्या कामी प्राथमिक मुद्दयांवर पुरावा देण्यासाठी निशाणी १७४ कडे मुदतीचा अर्ज दिलेला होता. सदरचा अर्ज न्यायालयाने नामंजूर करुन प्रतिवादीचा पुरावा बंद असा आदेश पारीत केला आहे. सदरचा पुरावा नाहीचा आदेश रद्द करुन मिळणेकरीता प्रस्तुत अर्ज दाखल केलेला आहे. त्यावर वादीने त्याचे म्हणणे दाखल करुन प्राथमिक मुद्दयाकामी पुरावा देण्यासाठी दि. १४/०२/२०२० पासून दावा प्रलंबित होता व सुमारे दोन वर्षानंतर प्रतिवादींविरुध्द पुरावा बंदचा आदेश पारीत करण्यात आलेला आहे असे कथन केलेले आहे. प्रतिवादींचा दाव्यास विलंब करुन वादीस न्यायापासून वंचित ठेवण्याचा हेतू आहे. प्रतिवादींनी त्यांना कोणता पुरावा द्यायचा आहे ते अर्जासोबत सादर करणे आवश्यक होते. तसा कोणताही पुरावा अर्जात किंवा अर्जासोबत सादर केलेला नाही. त्यामुळे सदरचा अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती केलेली आहे.

०३. प्रस्तुत दावा प्राथमिक मुद्दयाकामी पुरावा देण्यासाठी दि. १४/०२/२०२० पासून प्रलंबित होता. प्रतिवादींना मात्र वारंवार संधी देवूनही त्यांनी प्राथमिक मुद्दयाकामी पुरावा दिलेला नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र. १अ ते १ग यांच्याविरुध्द दि. ०३/०२/२०२२ रोजी प्राथमिक मुद्यावर पुरावा बंदचा आदेश पारीत करण्यात आलेला आहे. सदर प्रतिवादींनी प्राथमिक मुद्दयांकामी पुरावा देण्यासाठी झालेल्या विलंबाबाबत अर्जामध्ये कथन केलेले आहे की त्यांनी आवश्यक ती कागदपत्रे महसूल विभागाकडून व दुय्यम निबंधक कार्यालयाकडून मिळविलेली आहेत. त्याचबरोबर हे विसरुनही चालणार नाही की मार्च २०२० पासून कोरोना विषाणूच्या

महामारीमुळे कामकाज विस्कळीत झालेले होते. त्यामुळे न्यायाच्या पुर्ततेसाठी प्रतिवादी क्र. १अ ते १ग यांच्याविरुध्द झालेला प्राथमिक मुद्दयांवर पुरावा बंदचा आदेश रद्द करणे उचित होईल असे मला वाटते. त्यांच्या झालेल्या विलंबाबाबत त्यांच्यावर योग्य तो खर्च आकारणे आवश्यक आहे. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

अर्ज मंजूर करण्यात येतो.

प्रतिवादी क्र. १अ ते १ग यांच्याविरुध्द झालेला दि. ०३/०२/२०२२ रोजीचा प्राथमिक मुद्यांवर पुरावा बंदचा आदेश रद्द करण्यात येतो व त्यांना प्राथमिक मुद्यांवर पुरावा देण्याची संधी देण्यात येते.

प्रतिवादी क्र. १अ ते १ग यांनी वादीस रक्कम रुपये ५००/– खर्च म्हणून द्यावयाचा आहे.

Digitally signed by BHANUPRATAP B. CHOUHAN
Date: 2022.04.21 17:53:58 +0530

दि. २१/०४/२०२२ भानुप्रताप ब. चौहान
मालवण दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर

“CERTIFIED TO BE TRUE AND CORRECT COPY OF THE ORIGINAL SIGNED ORDER/JUDGMENT.”

Chandrakala Vasant Chavan
NAME OF STENOGRAPHER